संशोधन आराखडा

स्वातंत्र्यपूर्व काळातील निवडक मराठी साहित्याची राष्ट्रवाद विकासातील भूमिका: एक अभ्यास (कालखंड 1905 ते 1947)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञानशाखा अंतर्गत इतिहास विषयात पीएचडी पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा गोषवारा

संशोधक

स्नेहलता त्र्यंबकअप्पा स्वामी
एम.ए. (इतिहास)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संतोष सुधाकर कोटूरवार

सहायक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

नेताजी सुभाषचंद्रबोस महाविद्यालय, नांदेड

डिसेंबर - २०२३

प्रस्तावना :

भारताला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली, या चळवळींचे स्वरूप काळानुरूप बदलत गेले. मवाळ, जहाल, क्रांतीकारी पर्व, असहकार-चलेजाव चळवळी अशा चळवळींतून स्वातंत्र्यप्राप्तीची आकांक्षा सर्वसामान्य जनतेच्या मनात प्रज्वलित होत होती. याच कालावधीत प्रबोधन युग सुरू झाले, त्यात वर्तमानपत्रे, समाजसुधारकांचे कार्य व वैचारिक लेखन निश्चित महत्त्वपूर्ण ठरले परंतु या काळात ललित वाङमयातूनही राष्ट्रीय विचाराला खतपाणी घातले जात होते, स्फूर्ती गीते लिहिली जात होती, विविध नाटकांतून जनतेची मने स्वातंत्र्यप्राप्तीच्या भावनेने प्रेरीत केली जात होती तर कथात्मक वाङमयातून तत्कालीन साहित्यिक समाज मनास प्रेरणा देऊन इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी जनसामान्यांच्या मनात जागृतीची भावना निर्माण करीत होता. लेखक हा समाजमनाचा आरसा असतो असे म्हणतात त्यामुळे समकालाचे पडसाद साहित्यात उमटत असतात. तथापि अशा साहित्यामुळे त्या त्या काळाला एक वैचारिक दिशा ही मिळत असते, त्यामुळे प्रस्तुत संशोधनातून भारताच्या स्वातंत्र्यचळवळींबरोबर मराठी ललित साहित्यातून राष्ट्रवादाची भावना जागृत करण्याचे कार्य कशा पध्दतीने होत होते याचा अभ्यास केला जाणार आहे.

समाजातील वेगवेगळ्या भेदांच्या दरी मिटवून भारतमातेचे पुत्र म्हणून सर्व समाजाच्या मनात एकत्वाची भावना निर्माण करून भारतमातेला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्याची भावना ललित साहित्यातून निर्माण होत होती. जसे कवी केशवसुत आपल्या कवितेतून म्हणतात ब्राम्हण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथचा, असा पुकारा त्यांनी आपल्या नवा शिपाई या कवितेत केला, तर ‘देवा! केव्हा परवशपणाची निशा ही सरून स्वातंत्र्याचा द्‌युमणि उद्‌या यावयाचा फिरुन’ या शब्दांनी स्वातंत्र्याचा विचारही स्पष्टपणे व्यक्त केला.

किर्लोस्कर, खाडिलकर, गडकरी आदींच्या नाटकांतून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पोषक आशय, विषय मांडलेला दिसतो, अशा नाटकांमधून समाजमनांचे

क्षात्रतेज, क्षात्रवृत्तीला चेतना मिळत होती, इंग्रजांच्या जुलमी राजवटीला छेद देऊन स्वतंत्र भारताचे चित्र जनमनात साकारण्याचे कार्य नाट्यामधून होत होते. तसेच कार्य कथात्मक वाङमयातूनही होत होते. यात कथा असो वा कादंबरी, तत्कालिन लेखक नाथमाधव, ह. ना. आपटे, विभावरी शिरुरकर आदी लेखकांच्या साहित्यातून राष्ट्रीय भावनेला खतपाणी मिळत होते.

अर्थातच वर्तमानपत्र, वा वैचारीक लेखांनी जसे प्रबोधनाचे पर्व उभे करुन भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले. तसेच राष्ट्रवाद विकासात मराठी साहित्याची भूमिका तपासणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

विषय निवडीचे कारण :

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी साहित्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यात जसे तत्कालिन वर्तमानपत्रांतून वैचारिक लेखमाला सुरू झाल्या त्यातून उमटत होते व समाजमने स्वातंत्र्य प्राप्तीच्या आकांक्षेने भारीत होत होती. तसेच मराठी ललित साहित्यातून अर्थातच, कथात्मक, कविता, नाट्यांतूनही राष्ट्रीय भावना प्रेरीत करणारे लेखन तात्कालिन काळात घडत होते. त्यामुळे प्रबोधन पर्वात ललित साहित्याचेही महत्त्वाचे योगदान असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अशा साहित्याचा अभ्यास करुन भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रवाद विकासासाठी पुरक ठरलेल्या, प्रबोधन युगात महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेल्या अशा ललित साहित्याचा अभ्यास संशोधनातून करणे आवश्यक आहे, ज्यायोगे राष्ट्रवाद विकासात ललित साहित्याची भूमिका स्पष्टपणे अधोरेखित करणे शक्य होईल, राष्ट्रीय भावना जागृत करणारे असे तत्कालीन ऐतिहासिक साहित्य म्हणून नोंद घेणे शक्य होईल.

संशोधनाची उद्‌दिष्टे :

1) 1905 ते1947 या काळातील मराठीतील निवडक ललित वाङमयाचा अभ्यास करणे.

2) भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पुरक व राष्ट्रवाद विकासाला प्रेरक ठरलेल्या मराठी ललित साहित्याचा अभ्यास करणे.

3) मराठीतील राष्ट्रवाद विकासाला पूरक ठरलेल्या साहित्याचा शोध घेऊन असे साहित्य समाजाच्या पुढे आणणे.

4) राष्ट्रवाद विकासातील अशा मराठी साहित्याची भूमिका तपासणे.

गृहितके :

1) भारतीय स्वातंत्र्य चळवळींचा प्रभाव तत्कालिन मराठी साहित्यावर पडला.

2) मराठी साहित्यातून राष्ट्रवादाची भावना विकसित झाली.

संशोधन आराखडा :-

संशोधन उद्देशाची प्राप्ती करण्यासाठी आणि संशोधनाला योग्य दिशा देण्यासाठी संशोधन आराखडा तयार केला जातो. त्यामुळे संशोधनाचा आराखडा हा अत्यंत महत्त्वाचा असतो.

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश हा राष्ट्रवाद विकासाला पूरक ठरलेल्या मराठी ललित साहित्याचा अभ्यास करणे हा आहे.

संशोधन पध्दती :- यात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी बहुतांश अध्ययन केले जाणार आहे व मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले जाणार आहे.

संशोधनाचा कालखंड व मर्यादा :- संशोधनाचा कालखंड हा 1905 ते 1947 भारतीय स्वातंत्र्य चळवळीला समांतर निवडक मराठी ललित साहित्याचा अभ्यास हा आहे,

यात केवळ काव्य, कथात्मक व ललित निबंधाचा अभ्यास होणार आहे, अर्थातच केवळ ललित वाङमयाचा अभ्यास ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संदर्भ साहित्य संकलन :- सदर कालातील मराठी साहित्य संकलनासाठी विविध ग्रंथालयातून तत्कालीन निवडक कविता, कथा, कादंबरी व नाट्य आदी पुस्तकांचा त्यावर आधारित चित्रपटे, नाट्यप्रयोगांचे चलचित्रिकरण आदींचा उपयोग होणार आहे, तथ्य संकलनासाठी दुय्यम पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना :

विषय प्रवेशाच्या या प्रकरणात सादर विषयाच्या अनुषंगाने माहितीची अभ्यासात्मक पायाभरणी करण्यात येणार आहे. प्रकरणास अनुसरून विस्तृत स्वरूपाची आधारभूत माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी साहित्याचा पूर्वइतिहास व राष्ट्रवादाची संकल्पना.

प्रकरण तिसरे

मराठी कवितेतून विकसित झालेला राष्ट्रवाद.

प्रकरण चौथे

मराठी कथात्मक साहित्यातून विकसित झालेला राष्ट्रवाद.

प्रकरण पाचवे

मराठी नाटकांतून विकसित झालेला राष्ट्रवाद.

प्रकरण सहावे

निष्कर्ष

राष्ट्रवाद विकासाला पूरक ठरलेल्या ललित मराठी साहित्याचा अभ्यास करून योग्य ते निष्कर्ष मांडले जातील.

प्रकरण सातवे

संदर्भसूची

परिशिष्ट

संदर्भ सूची

* इतिहास संशोधन मंडळ संकेतस्थळावरील शोधपत्रिका व ई बुक

भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी.ए.आर.देसाई

• आधुनिक भारताचा इतिहास डॉ सुमन वैद्य शांता कोठेकर

४ ग्रोव्हर बीएल असं न्यू लूक आन मॉडर्न इंडियन हिस्ट्री

५ बिपिनचंद्र हिंदुस्तान फॉर इंडिपेंडन्स

६० अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा प्रदक्षिणा खंड पहिला का न्टीनेन्टल प्रकाशन सुधारीत आवृत्ती २००७

७ मराठी नाटकातील प्रमुख राजकीय व सामाजिक प्रवाह मकरंद साठे पॉप्युलर प्रकाशन (कुलकर्णी वान्ल साहित्य शोध आणि बोध पॉप्युलर प्रकाशन मुंबई आवृत्ती दुसरी १९९५ ९देशपांडे कुसूमावती मराठी कादंबरीचे पहिले शतक मुंबई मराठी साहित्य संघ आवृत्ती दुसरी १९७५ १०कुरूंदकर नरहर धारा आणि काठ देशमुख आणि कंपनी पुणे

१९ बांदिवडेकर चंद्रकांत मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा मेहता पब्लिशिंग हाउस

१२ गाडगीळ सन्रा मराठी काव्याचे विभाजन खंड पद्मगंधा प्रकाशन पूणे

१३ सावरकर विन्दा सावरकरांचे निवडक वाड्मय मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई १९७३

१४ श्री माटे म विजारगुंफा जय प्रकाशन मुंबई १९५५

१५ डॉ अळतेकर मन्मा मराठी निबंध सुविचार प्रकाशित

१६ शेवडे इंदुमती मराठी कथा उद्म आणि विकास सोमैया पब्लि मुंबई १९७३

१७ बनहट्टी श्रीना मराठी नाट्यकला उद्गम आणि विकास पूणे विद्यापीठ

१८ पवार गोमा व इतर संपा० मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप

१९ देशपांडे अन्ना आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ व्हिनस प्रकाशन पूणे

२० जोशी प्रन्न मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास प्रसाद प्रकाशन पूणे १९७८

२१ काळे केन्ना आणि इतर संपदा मराठी रंगभूमी नाटक आणि परंपरा
मुंबई मराठी साहित्य संघ मुंबई १९७१
२२ तत्कालीन निवडक साहित्य कृतीं
२३ संकेतस्थळावरण विविध वर्तमानपत्रातील संदर्भन

संशोधकाचे नाव :– स्नेहलता त्र्यंबकअप्पा स्वामी

भ्रमणध्वनी क्रमांक :- 7721829780

ईमेल आयडी :– sneha.swami85@gmail.com

प्रवर्ग :- इतर मागास वर्ग

मार्गदर्शकाचे नाव :- प्रा. डॉ. संतोष सुधाकर कोटूरवार

भ्रमणध्वनी क्रमांक :- 98609338138

ईमेल आयडी :- sskotur1976@gmail.com